# ८६ वे अ.भा. मराठी नाट्यसंमेलन, नांदेड.

या वर्षीचे ८६ वे अ.भा. मराठी नाट्यसंमेलन शनिवार दिनांक २८ जानेवारी २००६ व रविवार दिनांक २९ जानेवारी २००६ रोजी नांदेड येथे ज्येष्ठ व श्रेष्ठ नाटककार साहित्यिक प्रा. दत्ता भगत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. प्रथेप्रमाणे सकाळी निघालेली शोभायात्रा अनेक नामवंत कलाकारांसह नांदेड मधील हजारोंच्या संख्येने आलेल्या रसिकांमुळे भव्य अशीच होती. नाट्यदिंडीच्या अग्रभागी असलेले घोडेस्वार, महिलांनी फुगडीचा धरलेला फेर, पारंपारिक वेशात आलेल्या शाळकरी चिमुरड्या मुली, रस्त्या-रस्त्यांवर काढलेल्या आकर्षक रांगोळ्या आणि अनेक मान्यवर, नामवंत कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे ही दिंडी न भूतो न भविष्यती अशीच झाली होती.

शोभायात्रा गुरु गोविंदसिंग स्टेडियम, नांदेडच्या विस्तीर्ण संकुलात उभारलेल्या शंकरराव चव्हाण नाट्यनगरीच्या मुख्य व्यासपीठाकडे येऊन पोहोचल्यावर सकाळी ठीक १०.३० वा. नाट्यसंमेलनाच्या उद्‌घाटन सोहळ्याला सुरुवात झाली. कलाकारांनी सादर केलेल्या नांदीनंतर परिषदेचे प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे यांनी प्रास्ताविकात नाट्य परिषदेच्या कार्याचा अहवाल सादर केला. स्वागताध्यक्ष मा. श्री. अशोकराव चव्हाण यांच्या स्वागतपर भाषणानंतर नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी आणि उपाध्यक्ष श्री. हेमंत टकले यांनी उपस्थित मान्यवरांचे शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केले. उद्‌घाटक मा. श्री. विलासराव देशमुख, नाट्यसंमेलनाचे मावळते अध्यक्ष मा. श्री. सुरेश खरे, नियोजित अध्यक्ष मा. प्रा. दत्ता भगत आदी मान्यवरांनी नटराज पूजन व दीपप्रज्वलन केले.

उद्‌घाटक मा. श्री. विलासराव देशमुख यांनी आपल्या भाषणात रंगकर्मींच्या समस्यांविषयींचा आढावा घेतला व त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यानंतर मावळते नाट्य संमेलनाध्यक्ष मा. श्री. सुरेश खरे यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष मा. प्रा. दत्ता भगत यांचे अध्यक्ष झाल्याबद्दल अभिनंदन करुन त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व संमेलनाध्यक्षपदाची सूत्रे प्रदान केली.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष, श्री. मोहन जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कलाकारांना व तंत्रज्ञाना कायमस्वरुपी निवारा मिळण्यासाठी भूखंड देण्याची विनंती शासनाला केली.

सर्वश्री. राम निवास मिर्धा, अध्यक्ष, संगीत नाटक अकादमी, भारत सरकार, श्रीमती सूर्यकांता पाटील, राज्यमंत्री, सिने कलावंत अनुपम खेर, श्रीमती काजोल देवगण, श्रीमती उर्मिला मातोंडकर आणि हर्षवर्धन पाटील, इत्यादी मान्यवरांची भाषणे झाली. आपल्या अध्यक्षीय भाषणात संमेलनाध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांनी नाट्य चळवळीचा आढावा घेतला.

नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष हेमंत टकले यांनी आभार मानले.

या नाट्य संमेलनात प्रथमच नरहर कुरुंदकर मुख्य रंगमंच, शंकरराव चव्हाण नाट्यगृह, अण्णासाहेब गुंजकर रंगमंच, कुसूम नाट्यगृह, कृष्णराव फुलांब्रीकर मुक्त मंच या पाच रंगमंचावरुन अनेक कार्यक्रम सादर करण्यात आले.